# देगलूर महाविद्यालयात सुशासन दिन साजरा

देशोन्नती वृत्तसंकलन...

देगलूर ▪ आडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने २५ डिसेंबर रोजी माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचा जन्मदिवस हा सुशासन दिन म्हणून साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार हे होते. तर प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. बी. आर. कत्तुरवार विभाग प्रमुख लोकप्रशासन विभाग तथा अध्यक्ष लोकप्रशासन अभ्यास मंडळ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड हे होते. ते 'तणाव व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन करताना असे म्हणाले की, सुशासनाच्या निर्मितीसाठी प्रशासन व्यवस्थेतील प्रत्येक अधिकाऱ्याने मला मिळालेले पद व अधिकार हे लोकांचे कल्याण करण्यासाठी मिळालेले एक साधन म्हणून उपयोगात आणले पाहिजे. लोकप्रशासनात मुख्य प्रशासकाची भूमिका रेल्वेच्या इंजिन समान असते. रेल्वेचे इंजिन तासी ज्या गतीने धावते, त्याच गतीने सर्व डब्बे इच्छा असो अथवा नसो धावत असतात. प्रशासनातील ताण- तणाव कमी करण्यासाठी कार्यालयात मैत्रीपुर्ण संबंध जोपसावे, सर्वांना समान वागणुक द्यावी, कोणत्याही परिस्थितीत नियम व कायद्याची चौकट ओलांडू नये, असे म्हटले आहे. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी कार्यक्रमाकरीता शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार डॉ. खंदकुरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विनोद काळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता डॉ.सुरेश काशिदे यांचे सहकार्य लाभले.